# क्रांतीसुर्य अण्णासाहेब पाटील समाजकार्य महाविद्यालय, धाराशिव

**पत्ता : बार्शी नाका, धाराशिव**

## पोलीस भरती 2025 सराव पेपर - 02

वेळ : 1.30 (दीड) तास एकूण गुण : 100 एकूण प्रश्न: 100

1. **महाराष्ट्र राज्याचे सर्वाधिक सहावेळा उपमुख्यमंत्रीपद भूषविलेले स्व. अजित पवार यांचा जन्म कोणत्या ठिकाणी झाला होता?**
1) देवळाली प्रवरा 2) काटेवाडी 3) तेर 4) बोरखेडा

2. **2026 यावर्षीचा चालु अर्थसंकल्प महाराष्ट्र राज्याचा राज्य विधानसभेत कोण मांडणार आहे?**
1) सुनेत्रा पवार 2) सुधीर मुनगंटीवार
3) राधाकृष्ण वि.खे. पाटील 4) देवेंद्र फडणवीस

3. **महाराष्ट्रात कोणत्या ऑपरेशन अंतर्गत जानेवारी 2026 मध्ये 55 कोटीचे ड्रग्स रॅकेट उध्वस्त केले आहे?**
1) ऑपरेशन सातमाळा चेकमेट 2) ऑपरेशन सह्याद्री चेकमेट
3) ऑपरेशन सातपुडा चेकमेट 4) ऑपरेशन गोदावरी चेकमेट

4. **शासकीय रुग्णालय आणि शहरी आरोग्य केंद्रामध्ये विशेष रजोनिवृत्ती क्लिनिक सुरू करणारे भारतातील पहिले राज्य कोणते ठरले आहे?**
1) तामिळनाडु 2) मध्यप्रदेश 3) महाराष्ट्र 4) हिमाचल प्रदेश

5. **26 जानेवारी 2026 च्या प्रजासत्ताक दिनी चित्ररथ संचालनात कोणत्या राज्याने पहिला क्रमांक मिळवला आहे?**
1) महाराष्ट्र 2) केरळ 3) पं. बंगाल 4) राजस्थान

6. **ग्लुकोमिया हा रोग खालीलपैकी कोणत्या अवयवास होतो?**
1) डोळे 2) कान 3) मेंदू 4) आस्थी

7. **हिमोग्लोबीन तयार होण्यासाठी कशाची आवश्यकता असते?**
1) लोह 2) मँगनीज 3) फॉस्फरस 4) आयोडीन

8. **खालीलपैकी कोणते उदाहरण प्रोटोझोंआ या संघप्रकारत येत नाही?**
1) अमीबा 2) प्लासमोडीअम 3) हायड्रा 4) युग्लिना

9. **खालीलपैकी कोणता प्राणी सस्तनी गटातील आहे?**
1) कबुतर 2) शहामृग 3) पेग्विंन 4) वटवाघूळ

10. **मानवी शरीरातील सर्वात मोठे हाड कोणते?**
1) मांडीचें हाड 2) प्रगडा
3) मांडीचे हाड 4) अन्ननलिकेचे हाड

11. **एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम कोणी सुरु केला?**
1) राज्य सरकार 2) जिल्हा परिषद
3) महानगरपालिका 4) केंद्र सरकार

12. **पंढरपूरचे विठ्ठल मंदीर सर्वांना खुले व्हावे म्हणून महाराष्ट्रात जनमत संघटीत करणारे व विठ्ठल मंदीरासमोर प्राणांतिक उपोषण करणारे व्यक्तीमत्तव कोणते?**
1) बाबासाहेब आंबेडकर 2) एस.एम. जोशी
3) साने गुरुजी 4) पंजाबराव देशमुख

13. **कोणत्या सनाच्या दिवशी वडाच्या वृक्षाची पुजा केली जाते?**
1) वटपौर्णिमा 2) नारळी पौर्णिमा
3) गुरुपौर्णिमा 4) कोजागिरी पौर्णिमा

14. **केदारनाथ कोणत्या राज्यात आहे?**
1) उत्तरप्रदेश 2) हिमाचल प्रदेश
3) उत्तराखंड 4) जम्मु काश्मिर

15. **भारतातील आरक्षण व वस्तीगृहाचे जनक कोण होते?**
1) श्रीमंत आप्पासाहेब 2) राजर्षी शाहू महाराज
3) चौथे शिवाजी महाराज 4) श्रीमंत जयसिंग राव

16. **चांदोली धरण कोणत्या नदीवर आहे?**
1) वारणा 2) कोयना 3) कृष्णा 4) वेण्णा

17. **मध्यवर्ती कंदपीके संशोधन संस्था कोठे आहे?**
1) डेहराडून 2) अर्नाकुलम 3) तिरुवउनंतपुरम 4) लखनौ

18. **मुंबई हाय हे नाव कोणत्या खनिज उत्पादनाशी निगडीत आहे?**
1) पेट्रोलियम 2) कोळसा 3) मीठ 4) मॅगनीज

19. **संत जर्नादन स्वामी महाराजांची समाधी कोठे आहे?**
1) पैठण 2) कोपरगाव 3) देहू 4) पंढरपूर

20. **नागपूर जवळील ...... येथे संरक्षण साहित्याचा कारखाना आहे.**
1) अंबाझरी 2) काटोला 3) कामठी 4) कळमेश्वर

21. **गडचिरोली जिल्ह्यात वनविभागाचे लाकुड संकलन केंद्र कुठे आहे?**
1) सिरोंचा 2) आलापली 3) एटापल्ली 4) भामरागड

22. **महात्मा गांधीची हत्या कधी झाली?**
1) 1947 2) 1950 3) 1948 4) 1949

23. **महाराष्ट्राचे लोकनृत्य कोणते?**
1) लावणी 2) नौटंकी 3) झुमर 4) गरबा

24. **भारतीय राज्यघटनेने केलेली राज्य विधानसभेची जास्तीत जास्त सभासद संख्या किती आहे?**
1) 550 2) 250 3) 100 4) 500

25. **पोलीसांशी संबंध असलेल्या सी.बी.आय. चा फुल फॉर्म काय आहे?**
1) कंट्रोल ब्युरो ऑफ इंडिया 2) सेंट्रल ब्युरो ऑफ इंडिया
3) सैट्रल बॅंक ऑफ इंडिया 4) सैट्रल ब्युरो ऑफ इन्वेस्टीगेशन

26. **लाली — या शब्दाचे वचन बदलून येणारे रूप शोधा.**
1) लाल्या 2) लाले 3) लाली 4) लालू

27. **तेलगु भाषिक नसलेला शब्द.**
1) अनारसा 2) शिकेकाई 3) बंडी 4) खलबत्ता

28. **'आमचे एक ग्रामस्थ कलेक्टर कचेरीत कारकून असल्यामुळे त्यांच्याकडे आम्ही बिऱ्हाड ठेवले' कर्म ओळखा ?**
1) ठेवले 2) आम्ही 3) त्यांच्याकडे 4) बिऱ्हाड

29. **'अधोमुख' या शब्दाचा विरूद्धार्थी शब्द ओळखा.**
1) संमुख 2) उन्मुख 3) विमुख 4) दुर्मुख

30. **खालीलपैकी रीति भूतकाळाचे वाक्य कोणते ?**
1) तो रोज व्यायाम करत असतो . 2) तो रोज व्यायाम करतो.
3) तो रोज व्यायाम करत असतो. 4) तो रोज व्यायाम करत असे.

31. **'हात दाखवणे' या वाक्यप्रचाराचा अर्थ :**
1) विजयाची खूण करणे 2) अभिवादन करणे
3) निरोप घेणे 4) चोप देणे

32. **पुढील पद्यपंक्तीतील अलंकार ओळखा.**
**लहानपण दे गा देवा ! मुंगी साखरेचा रवा !**
**ऐरावत रत्न थोर ! त्यासी अंकुशाचा मार !**
1) उपमा 2) दृष्टांत 3) उत्प्रेक्षा 4) अतिशयोक्ती

33. **खालील वाक्याचा प्रकार ओळखा- ? गांधीजींना सुताच्या माळा अधिक आवडत.'**
1) संयुक्त वाक्य 2) मिश्र वाक्य
3) केवल वाक्य 4) गौणवाक्य

34. **इकडून, तिकडून, दुरून, लांबून ही उदाहरणे कोणत्या क्रियाविशेषण अव्ययाची आहेत ?**
1) गतिदर्शक 2) स्थितीदर्शक
3) कालवाचक 4) सातत्यदर्शक

35. **समानार्थी शब्दाच्या जोड्या लावा.**

| **अ-गट** | **ब-गट** |
|---|---|
| अ) अमृत | 1) शुक |
| ब) पोपट | 2) विस्तव |
| क अनल | 3) हिमांशू |
| ड) चंद्र | 4) सुधा |

**पर्यायी उत्तरे:**

| | **अ** | **ब** | **क** | **ड** |
|---|---|---|---|---|
| 1) | 4 | 1 | 2 | 3 |
| 2) | 4 | 3 | 2 | 1 |
| 3) | 3 | 4 | 1 | 2 |
| 4) | 2 | 3 | 4 | 1 |

36. **सर्वनामाचा प्रकार ओळखा:- 'जो'**
1) पुरूषवाचक सर्वनाम 2) दर्शक सर्वनाम
3) संबंधी सर्वनाम 4) अनिश्चित सर्वनाम

37. **ध्वन्यर्थ म्हणजे.**
1) 'अभिधा' शक्तीमुळे जाणवणारा अर्थ
2) 'व्यंजना' शब्दशक्तीमुळे सूचित होणारा अर्थ
3) 'लक्षणा' शब्दशक्तीमुळे जाणवणारा अर्थ
4) भाषेतील मूलध्वनींचा अर्थ

38. **विसर्गचिन्ह ओळखा.**
1) . 2) ; 3) ! 4) :

39. **रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**
**मराठी भाषा मुख्यत: ……………लिपीत लिहीली जाते.**
1) मोडी 2) बाळबोध 3) देवनागरी 4) नागरी

40. **'बाजीप्रभुने खिंड लढविली' या वाक्याचा प्रकार ओळखा.**
1) केवल वाक्य 2) मिश्र वाक्य
3) संयुक्त वाक्य 4) आज्ञार्थी वाक्य

41. **'दूहेरी' हा शब्द संख्याविशेषणाच्या कोणत्या पोट प्रकारातील आहे?**
1) क्रमवाचक 2) पृथकत्ववाचक
3) आवृत्तिवाचक 4) गणनावाचक

42. **पुढील 'विध्यर्थ' क्रियापदावरून कोणता बोध होतो ते खालील पर्यायातून निवडा. 'या औषधाने त्याला आराम पडावा.'**
1) कर्तव्य 2) योग्यता 3) शक्यता 4) तर्क

43. **खालील वाक्यातील अधोरेखित शब्दाची जात ओळखा.**
**'वानर' वडावर चढले.**
1) भाववाचक 2) विशेषनाम
3) सामान्यनाम 4) धातुसाधित नाम

44. **'चाकूमुळे' यातील 'मुळे' हे कोणते अव्यय आहे ?**
1) उभयान्वयी 2) केवलप्रयोगी
3) क्रियाविशेषण 4) शब्दयोगी

45. **मध्यमपदलोपी समासाची उदाहरणे ओळखा.**
1) आईवडील, कौरवपांडव 2) चहापाणी, भाजीपाला
3) बरेवाईट, खरेखोटे 4) बटाटेभात, पुरणपोळी

46. **'कुत्रा' या नामाचे सामान्यरूप काय होईल ?**
1) कुत्र्या 2) कुत्रा 3) कुत्रे 4) कुत्री

47. **जेव्हा क्रियापदाचे रूप कर्त्याच्या किंवा कर्माच्या लिंग, वचनाप्रमाणे बदलत नसून ते नेहमी तृतीय पुरूषी, नपुंसकलिंगी व एकवचनी असून स्वतंत्र असते त्याला म्हणतात.**
1) कर्तरी प्रयोग 2) कर्मणी प्रयोग
3) भावे प्रयोग 4) कर्मकर्तरी प्रयोग

48. **'क्ष' आणि 'ज्ञ' ही ……………………आहेत.**
1) महाप्राण 2) अल्पप्राण 3) जोडाक्षरे 4) यापैकी नाही

49. **अरेरे, ओहो, वा, शाबास, छे, शी इत्यादी शब्दारूपावरून कोणत्या अव्यय प्रकाराचा बोध होतो ?**
1) अ फक्त बरोबर बाकी सर्व चूक
2) ब फक्त बरोबर बाकी सर्व चूक
3) क फक्त बरोबर बाकी सर्व चूक
4) ड फक्त बरोबर बाकी सर्व चूक

50. **जोड्या लावा.**

| **प्राणी** | **लिंग** |
|---|---|
| अ) मोर | 1) लांडोर |
| ब) रेडा | 2) शेळी |
| क) बोका | 3) भाटी |
| ड) बोकड | 4) म्हैस |

**पर्यायी उत्तरे:**

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| 1) | 1 | 4 | 3 | 2 |
| 2) | 1 | 4 | 2 | 3 |
| 3) | 1 | 2 | 4 | 3 |
| 4) | 4 | 1 | 2 | 3 |

51. **75 पैसे हे 3 रुपयाचे शेकडा किती टक्के ?**
1) 75 2) 25 3) 65 4) 50

52. **विराट कोहली 400 मीटर अंतर 48 सेकंदात पार करतो तर त्याचा ताशी वेग किती ?**
1) 20 कि.मी. 2) 24 कि.मी. 3) 28.5 कि.मी. 4) 30 कि.मी.

53. **2000रु. चे द.सा.द.शे. 5% दराने 5 वर्षांसाठी सरळव्याजाने किती व्याज होईल ?**
1) 500 2) 50 3) 250 4) 5000

54. **0.123 + 12.3 + 0.0123 + 1.23 = किती ?**
1) 13.776 2) 13.6653 3) 13.6563 4) 13.5663

55. **पाच संख्यांची सरासरी 17 आहे. त्यापैकी पहिल्या चार संख्यांची सरासरी 16 आहे. तर पाचवी संख्या कोणती ?**
1) 21 2) 19 3) 18 4) 9

56. **एका व्यक्तीचा पगार रुपये 57850 आहे त्याच्या पगारात 20 टक्के वाढ झाली तर त्याचा नवीन पगार किती ?**
1) रु. 71400 2) रु. 69420 3) रु. 65220 4) रु. 65225

57. **एक ट्रेन 90 किमी. प्रति तास या वेगाने एका खांबाला 10 सेकंदात ओलांडते तर त्या ट्रेनची लांबी किती ?**
1) 900 मीटर 2) 250 मीटर 3) 450 मीटर 4) 300 मीटर

58. **एक कामाला Aला 24 दिवस लागतात, B ला 48 दिवस लागतात आणि C ला 16 दिवस दिवस्तालागतात, खादिवस लागत किती दिवसात करतील ?**
1) 4 2) 12 3) 10 4) 8

59. **एका स्टँडवर काही मोटारसायकली व तीन चाकी रिक्षा उभ्या आहेत. त्यांच्या चाकांची एकत्रित संख्या 45 असुन हँडलची संख्या 19 आहे तर त्या स्टँडवर मोटारसायकली व तीन चाकी रिक्षा अनुक्रमे किती आहेत ?**
1) 12,7 2) 7,12 3) 13,6 4) 6,13

60. **83*39 या संख्येला 11 ने नि:शेष भाग जातो तर च्या ठिकाणी कोणता अंक येईल ?**
1) 9 2) 3 3) 0 4) 1

61. **प्रत्येक 1 मीटर अंतरावर एक या प्रमाणे 14 झाडे एका रांगेत आहेत तर पहिल्या व शेवटच्या झाडामध्ये अंतर किती ?**
1) 12 मीटर 2) 13 मीटर 3) 145 मीटर 4) 15 मीटर

62. **रुपेश, दिनेश व महेश यांचे सरासरी वजन 15 किलो आणि त्यांच्या वजनाचे गुणोत्तर अनुक्रमे 2:3:4 आहे तर रुपेश, दिनेश, महेश यांचे वजन किती किलो असेल ?**
1) 10,15,20 2) 20,15,10
3) 10,20,15 4) 20, 30, 15

63. **दोन संख्यांचा मसावि 6 असून त्यांचा लसावि 72 आहे. त्या संख्या 3:4 या प्रमाणात आहेत तर त्या संख्या कोणत्या ?**
1) 20,21 2) 25,30 3) 19,21 4) 18,24

64. **एका हॉलची लांबी 15 मीटर व रुंदी 10 मीटर असून हॉलमध्ये 0.25 मीटर लांबीच्या चौरसाकृती फरशा बसवायच्या आहेत तर त्यासाठी किती फरशा लागतील ?**
1) 4200 2) 240 3) 2400 4) 420

65. **एका टेबलाची खरेदी किंमत 5000 रुपये होती व त्याची विक्री रु.6500 ला केली तर किती टक्के नफा होईल ?**
1) 32 2) 30 3) 35 4) 40

66. **एक विक्रेता 10 टक्के किंमत वाढवून 10 टक्के सुट देतो तर त्याला त्या व्यवहारात किती टक्के नफा अगर तोटा होतो ?**
1) ना नफा ना तोटा 2) 1 टक्के नफा
3) 1 टक्के तोटा 4) 10 टक्के नफा

67. **तीन संख्या 4:5:6 या प्रमाणात असुन त्यांची सरासरी 25 आहे तर सर्वात मोठी संख्या कोणती ?**
1) 42 2) 36 3) 32 4) 30

68. **खालीलपैकी मोठा अपुर्णांक कोणता ?**
1) $\frac{3}{5}$ 2) $\frac{5}{7}$ 3) $\frac{7}{9}$ 4) $\frac{9}{8}$

69. **क्रिकेटच्या पहिल्या डावात एका संघाने 252 धावा जमविल्या, दुसरा संघ पहिल्या 22 षटकांत सरासरी 4.5 धावा काढु शकला तर विजय मिळविण्यासाठी उरलेल्या 28 षटकांत कमीत कमी किती धावांची सरासरी ठेवावी लागेल ?**
1) 5.5 2) 5.6 3) 5.4 4) 5.2

70. **11 पुस्तकांची किंमत 92.4 रु. असल्यास 15 पुस्तकांची किंमत किती होईल ?**
1) 148 रु. 2) 142 रु. 3) 132 रु. 4) 126 रु.

71. **दुधाचा भाव 15 रु लीटर असताना रोज 400 मिलिलीटर दूध घेतले. तर संपुर्ण जुन महिन्याचे दुध बिल किती रुपये होईल ?**
1) 190 रु. 2) 186 रु. 3) 180 रु. 4) 175 रु.

72. $0.5\times 0.05 \times 0.5 = ?$
1) 1.25 2) 12.5 3) 0.125 4) 0.0125

73. **एका फळविक्रेत्याने 48 संत्री विकल्याने 8 संत्र्याच्या विक्री किमतीएवढा नफा झाला तर शेकडा नफा किती?**
1) 10% 2) 20% 3) 25% 4) 15%


74. **दोन रेल्वे विरुध्द दिशेने धावताना प्लॅटफॉर्ममधील उभ्या व्यक्तीला अनुक्रमे 28 सेकंद आणि 18 सेकंद मध्ये पार करतात. तया रेल्वेना एकमेकीना पार करण्यासाठी 26 सेकंद लागतात तर त्यांच्या वेगांचे गुणोत्तर किती?**
1) 3:2 2) 1:4 3) 4:1 4) 2:3

75. **8 व्यक्तीच्या समुहाचे सरासरी वजन जेव्ळा त्याच्यापैकी 65 किलो वजनाच्या व्यक्तीच्या जागी दुसरा व्यक्ती आल्यास 2.5 किलोने वाढते तर नवीन व्यक्तीचे वजन किती?**
1) 80 किलो 2) 85 किलो 3) 90किलो 4) 75किलो

76. **धावण्याच्या शर्यतीत अमरच्या पुढे 3 स्पर्धक होते.समीर हा अमरच्या मागे चैथा होता व समीरचा शेवटून दुसरा क्रमांक होता. तर पहिल्या व शेवटच्या स्पर्धकांच्या दरम्यान एकुण किती स्पर्धक होते?**
1) 7 2) 6 3) 5 4) 8

77. रामचे मार्क राणीपेक्षा जास्त आहेत. राणीचे मार्क रत्नापेक्षा कमी आहेत. रत्नाचे मार्क रामपेक्षा जास्त आहेत. पद्माचे मार्क रामपेक्षा जास्त आहेत. रत्नास पद्मापेक्षा अधिक मार्क आहेत. तर सर्वात कमी मार्क कोणाला आहेत?
1) रत्ना 2) पद्मा 3) राम 4) राणी

78. प्रश्नचिन्हांच्या जागी कोणती संख्या येईल?




1) 2 2) 3 3) 4 4) 1

79. प्रश्नचिन्हांच्या जागी कोणती संख्या येईल.
15, 16, 24, 51, ?, 240
1) 120 2) 115 3) 72 4) 102

80. विधाने: सर्व मासे कासव आहेत.
काही मगर मासे आहेत.
निष्कर्ष: 1) काही मगर कासव आहेत.
2) कोणतेही कासव मगर नाही.
1) निष्कर्ष 1 योग्य 2) निष्कर्ष 2 योग्य
3) दोन्ही निष्कर्ष योग्य 4) एकही निष्कर्ष योग्य नाही

81. मीना व टीना यांच्या आजच्या वयाचे गुणोत्तर अनुक्रमे 5 : 9 आहे. व त्यांच्या वयाची बेरीज 42 वर्षे असल्यास मीनाचे आजपासून पुढे 5 वर्षानी वय खालीलपैकी किती असेल?
1) 16 वर्षे 2) 27 वर्षे 3) 15 वर्षे 4) 20 वर्षे

82. राहुल त्याच्या घरापासून 15 किलोमीटर पश्चिमेला गेला आणि नंतर तो डाव्या बाजूला वळून 10 किलोमीटर गेला. पुन्हा डावीकडे वळून 30 किलोमीटर गेला. तर आता तो त्याच्या घरापासून किती अंतरावर आहे?
1) 10 किमी 2) 40 किमी 3) 25 किमी 4) 15 किमी

83. तीन दिवे अनुक्रमे 15, 18 आणि 20 सेकंदाच्या अंतराने चमकतात तर ते तिन्ही दिवे एकत्र चमकायला किती वेळ लागेल?
1) 4 मि 2) 3 मि 3) 7 मि 4) 5 मि

84. 1 जानेवारी 2021 ला शुक्रवार दिवस होता. तर 2023 वर्षातील महिला दिन कोणत्या दिवशी येईल?
1) सोमवार 2) मंगळवार 3) बुधवार 4) गुरुवार

85. एका सांकेतिक भाषेमध्ये COMPUTER हा शब्द RFUVQNPC असा लिहितात. तर MEDICINE हा शब्द कसा लिहिला जाईल?
1) MFEDJJOE 2) EIJDEJFM
3) MFEJDJIE 4) EOJDJEFM

86.

| | | |
|---|---|---|
| 7 | 370 | 3 |
| 6 | 224 | 2 |
| x | 730 | 1 |

तर x =?

1) 2 2) 10 3) 12 4) 9

87. विशाल, प्रिया, रघु, कार्तिक, आणि विरु हे 5 मित्र आहेत. विशाल प्रियापेक्षा दुप्पट वयाचा आहे. रघुप्रियापेक्षा निम्म्या वयाचा आहे. विशालचे वय विरुपेक्षा निम्मे आहे. रघुचे वय कार्तिकच्या दुप्पट आहे. तर सर्वात लहान कोण आहे?
1) विरु 2) कार्तिक 3) प्रिया 4) विशाल

88. एका रांगेत विजय उभा आहे. त्याच्यामागे 9 व पुढे 11 मुले आहेत. तर मागुन 3 रा मुलगा पुढून किती क्रमांकावर असेल?
1) 17 वा 2) 18 वा 3) 19 वा 4) 16 वा

89. झऱ्याला ओढा म्हटले, ओढ्याला धबधबा म्हटले धबधब्याला नदी म्हटले, नदीला नाला म्हटले, तर होडी खालीलपैकी कशात चालेल?
1) ओढा 2) धबधबा 3) नाला 4) नदी

90. मराठी महिन्यांची सुरुवात भद्रपद पासुन सुरु होते असे समजल्यास वर्षाचा सहावा महिना खालीलपैकी कोणता असेल?
1) चैत्र 2) पौष 3) माघ 4) वैशाख

91. आय..पी.एल. च्या पहिल्या सामन्यात चेन्नईच्या पहिल्या नऊ खेळाडुच्या धावांची सरासरी 24 होती. दहाव्या फलंदाजाने काही धावा काढल्या व तो बाद झाला. आता ती सरासरी 25 झाली, तर दहाव्या खेळाडूच्या धावा किती?
1) 24 2) 34 3) 25 4) 28

92. योग्य पर्यायाच्या सहाय्याने रिक्त स्थानाची पुर्ति करा.
A10 : Z35 : : K20 : ?
1) J9 2) J18 3) J90 4) J19


93. जर LEADER हा शब्द 20-13-9-12-13-36 असा लिहिला जात असेल तर, LIGHT हा शब्द कसा लिहाल?
1) 20-16-17-15-27 2) 20-15-16-18-23
3) 20-17-15-16-28 4) 20-16-15-17-22

94. 1 : 30 वाजता घड्याळाचा तासकाट व मिनीट काटा यात किती अंशाचा कोन असेल?
1) $150^0$ 2) $165^0$ 3) $185^0$ 4) $135^0$

95. अ ने द्राक्ष आणि अननस खाल्ले, ब ने द्राक्ष आणि संत्री खाल्ली, क ने संत्री अननस आणि सफरचंदे खाल्ली, ड ने द्राक्ष, सफरचंदे आणि अननस खाल्ले, फलाहारानंतर ब आणि क आजारी पडले. वरील वस्तुस्थितिसंदर्भात असे म्हणता येईल की आजाराचे कारण होते/ होती.
1) सफरचंद 2) अननस 3) द्राक्ष 4) संत्री

96. प्रितीचा मुलगा प्रविण आहे. राम हा प्रितीचा भाऊ आहे, नितारला एक मुलगी आहे, तिचे नाव रिमा आहे, निता ही रामची बहीण आहे, तर प्रविणचे रिमाशी नाते काय ?
1) भाऊ 2) पुतण्या 3) मावसभाऊ 4) काका

97.




1) 89 2) 149 3) 56 4) 69

98. प्रश्नचिन्हांच्या जागी कोणती संख्या येईल.
17, 37, 65, 101, ?, 197
1) 135 2) 145 3) 136 4) 152

99. 157, 181, 209, 241, 277, ? या मालिकेतील प्रश्नचिन्हांच्या जागी काय येईल.
1) 317 2) 301 3) 313 4) 321

100. सौरभचे घड्याळ दर तासाला 5 सेकंद मागे पडते. रविवारी दुपारी 3 वाजता ते बरोबर लावले होते. बुधवारी दुपारी 3 वाजता ते कोणती वेळ दाखवेल?
1) 3.06 2) 2.51 3) 3.54 4) 2.54

# क्रांतीसुर्य अण्णासाहेब पाटील समाजकार्य महाविद्यालय, धाराशिव

पत्ता : बार्शी नाका, धाराशिव

## पोलीस भरती 2025 सराव पेपर - 02

वेळ : 1.30 (दीड) तास.    एकूण गुण : 100    एकूण प्रश्न : 100

| पोलीस भरती सराव पेपर क्र . 02 | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Question No | Answer | Question No | Answer | Question No | Answer | Question No | Answer |
| **1** | 1 | **26** | 3 | **51** | 2 | **76** | 1 |
| **2** | 4 | **27** | 4 | **52** | 4 | **77** | 4 |
| **3** | 2 | **28** | 4 | **53** | 1 | **78** | 2 |
| **4** | 3 | **29** | 2 | **54** | 2 | **79** | 2 |
| **5** | 1 | **30** | 4 | **55** | 1 | **80** | 1 |
| **6** | 1 | **31** | 4 | **56** | 2 | **81** | 4 |
| **7** | 1 | **32** | 3 | **57** | 2 | **82** | 4 |
| **8** | 3 | **33** | 3 | **58** | 4 | **83** | 2 |
| **9** | 4 | **34** | 1 | **59** | 1 | **84** | 3 |
| **10** | 3 | **35** | 1 | **60** | 3 | **85** | 4 |
| **11** | 4 | **36** | 3 | **61** | 2 | **86** | 4 |
| **12** | 3 | **37** | 2 | **62** | 1 | **87** | 2 |
| **13** | 1 | **38** | 4 | **63** | 4 | **88** | 3 |
| **14** | 3 | **39** | 3 | **64** | 3 | **89** | 3 |
| **15** | 2 | **40** | 1 | **65** | 2 | **90** | 3 |
| **16** | 1 | **41** | 3 | **66** | 3 | **91** | 2 |
| **17** | 3 | **42** | 3 | **67** | 4 | **92** | 4 |
| **18** | 1 | **43** | 3 | **68** | 4 | **93** | 3 |
| **19** | 2 | **44** | 4 | **69** | 1 | **94** | 4 |
| **20** | 1 | **45** | 4 | **70** | 4 | **95** | 4 |
| **21** | 2 | **46** | 1 | **71** | 3 | **96** | 3 |
| **22** | 3 | **47** | 3 | **72** | 4 | **97** | 4 |
| **23** | 1 | **48** | 3 | **73** | 2 | **98** | 2 |
| **24** | 4 | **49** | 2 | **74** | 3 | **99** | 1 |
| **25** | 4 | **50** | 1 | **75** | 2 | **100** | 4 |